**नियमित दरखास्त क्र. २४/२०१६ निशाणी क्र. ०१ वरील आदेश**
**( दि. १०.०७.२०२६ रोजी पारीत )**

प्रस्तूतचा प्रकरणात दि. ३०.०३.२०२४ रोजी नि. क्र. १७ वरील आदेशाप्रमाणे विधिज्ञ श्री. ए. आर. क्षिरसागर यांची मौजे देशिंग, ता. कवठे महांकाळ येथील घर नं. १०४३ चे विभाजन सुचवण्यासाठी आदेश २६ नियम १३ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी निशाणी २२ वर सविस्तर अहवाल, पंचनामा, दोन्ही पक्षकारांना पाठवलेली नोटीस, पोष्टाची पावती, पोहच पावत्या सादर केलेल्या आहेत.

२. सदर अहवालाचे अवलोकन केले असता कोर्ट कमिशनर यांनी दोन्ही पक्षकारांना दि. १९.०८.२०२४ रोजी नोंदणीकृत पोष्टाद्वारे नोटीस देवून दि. ३०.०८.२०२४ रोजी जायमोक्यावर हजर राहण्याबाबत कळवले होते. त्याप्रमाणे दि. ३०.०८.२०२४ रोजी ते स्वतः घर मिळकत क्र. १०४३ व सध्य मिळकत क्र. १०४१ मध्ये प्रत्यक्ष गेले होते. त्यावेळी डी. एच. व पंच हजर होते व जाबदार / जे. डी. क्र. १ हे गैरहजर असून त्यांचे पंच व पत्नी हजर होते. जाबदार क्र. २ गैरहजर होते. त्यानंतर त्यांनी हजर व्यक्तींसमोर वाद मिळकतीचे मोजमाप केले होते व वस्तूःस्थितीप्रमाणे पंचनामा केला होता.

३. कोर्ट कमिशनर यांनी सुचवल्याप्रमाणे वाद मिळकतचा निम्मा निम्मा सोईस्कररित्या करायचे झाल्यास पुर्वेकडील एक भाग अ व पश्चिमेकडील भाग ब असे करुन पूर्वेकडील अ निम्मा भाग अर्जदार डी. एच. ला तर पश्चिमेकडील ब हा निम्मा भाग जे. डी. यांना देता येईल अथवा कोणताही एक भाग जे.डी. अथवा डी.

एच. यांना त्यांच्या सोईने घेण्यास मुभा राहील असे सुचवले आहे.

४. अभिलेखावरील दोन्ही पक्षकारांचे म्हणणे मागवण्यात आले होते. धनको हिने सदरचा कोर्ट कमिशनर अहवाल मान्य असून नकाशातील पुर्वेकडील भाग अ तिला स्वतःला घेण्यास हरकत नसल्याचे कळवले आहे. याउलट जे.डी. नं१ यांनी अथवा त्याची कुलमुखत्यारधारक पत्नी सुनंदा दत्तात्रय वावरे यांनी कोर्ट कमिशनर अहवालावर त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. सबब सदरचा अहवाल त्यांचे म्हणणेविना विचारात घेण्यात आला आहे.

५. एकंदर अहवाल व सोबत दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले असता कोर्ट कमिशनर यांनी दोन्ही पक्षांना नोटीस देवून नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केल्याचे दिसत आहे. जे.डी. नं. १ ची कुलमुखत्यारधारक पत्नी सुनंदा दत्तात्रय वावरे ही कोर्ट कमिशन कामावेळी हजर होती ही बाब अभिलेखावर आलेली आहे. जे. डी. यांनी हजर राहून सदर अहवालावर कोणताही आक्षेप घेतलेला नाही. याउलट धनको हिने अहवाल मान्य केलेला आहे. कोर्ट कमिशनर यांनी अवलंबलेल्या प्रक्रियेमध्ये अनियमितता असल्याचे दर्शवुन दिलेले नाही. सबब सदर अहवाल व सोबतचा नकाशा स्विकारुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास कोणतीही अडचण असल्याचे दिसून येत नाही. कोर्ट कमिशन अहवाल नि. २२ मध्ये सुचवल्याप्रमाणे तसेच धनको हिने सदर अर्जावर दिलेल्या संमतीप्रमाणे, कोर्ट कमीशन अहवालासोबतच्या नकाशातील पुर्वेकडील भाग अ धनको आक्काताई हीस देणे योग्य होईल तसेच भाग ब ऋणको यास देणे योग्य होईल. सबब कोर्ट कमिशनर अहवाल नि. २२ व सोबतचा नकाशा स्विकृत करण्यात येतो. सबब खालील आदेश.

## आदेश

१. कोर्ट कमिशनर अहवाल नि. २२ व सोबतचा नकाशा स्विकृत करण्यात येतो.

२. कोर्टकमीशनर यांनी नकाशात दर्शवलेला, पुर्वेकडील **भाग अ** धनको हिस तर पश्चीमेकडील **भाग ब** ऋणको क्र. १ यास देण्यात येतो.

३. धनको आक्काताई हिस, कोर्टकमीशनर यांनी नकाशात दर्शवलेला पुर्वेकडील **भाग अ** चा स्वतंत्र ताबा देण्यात यावा.

४. धनको हिने उपरोक्त नमुद वाटपाप्रमाणे ताबा मिळणेसाठी आवश्यक ती पुर्तता करावी.

५. कोर्ट कमिशनर अहवाल नि. २२ व सोबतचा नकाशा अंतिम हुकुमनाम्याचा भाग समजण्यात यावा.

६. घरमिळकतीचा वाटपा संबंधीचा अंतिम हुकुमनामा तयार करण्यात यावा.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.07.10 16:18:25 +0530

दिनांक: १०.०७.२०२६ **( एम.ए.कुलकर्णी )**

ठिकाण: कवठेमहांकाळ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कवठेमहांकाळ

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 10.07.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 10.07.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 10.07.2026 |